# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
## प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. (०२३१) २६५२९५२
२६६०४४८
फॅक्स क्र. (०२३१) २६५२९५२
E-mail: rokolhapur@mpcb.gov.in

उद्योग भवन,
कलेक्टर ऑफीस जवळ,
कोल्हापूर - ४१६ ००३.
Website:http://mpcb.mah.nic.in


जा.क्र. मप्रनिमं/प्राका/को/ FT0152/11 दि. 12/10/11

प्रति,
वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ,
मुंबई.

विषय - प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकांची तात्पुरती ज्येष्ठता सुची बद्दल आक्षेप/निवेदन.

संदर्भ - १. आपले परिपत्रक क्र. मप्रनि/आस्था/का- /ब-११७४ दि. २७.३.२०११.
२. स्वाक्षरदाराचे यापुर्वीचे दि. ३.११.२००७ चे निवेदन/आक्षेप.
३. स्वाक्षरदाराची दि. ५.१०.२००७, ३.२.२००९, ६.८.२००९, १.४.२०१० ची पत्रे.

---

महोदय,

मंडळाने परिपत्रक क्र. जा.क्र. मप्रनि/आस्था/का-४/ब-११०७ दि. ११.१०.२००७ व्दारे व तसेच आता पुनश्चः दि. २७.९.२०११ च्या परिपत्रकाव्दारे प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकाची तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसारित केलेली होती व आहे. त्याबाबत यापूर्वीच मी माझ्या पत्र क्र. मप्रनि/उप्राकाला/१२८५ दि. ३.११.२००७ व्दारे माझे आक्षेप नोंदविले होते, मात्र ते विचारात न घेता आता पुनश्चः म.प्र.नि. मंडळाने दि. २७.९.२०११ च्या परिपत्रकाव्दारे प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकांची तात्पुरती ज्येष्ठता सुची प्रसारित केलेली आहे. तरी पुनश्चः मी माझ्या दि. ३.११.२००७ पत्राव्दारे आक्षेप नोंदविले होते त्याची छायांकित प्रत सोबत जोडत आहे. त्यानुसार व त्याचा विचार होवून माझे व श्री. नि.गु. निहूल यांची नावे मंडळाने आता दि. २७.९.२०११ च्या परिपत्रकामध्ये तात्पुरती ज्येष्ठता सूचीतील अनुक्रमांक ८ व ९ मधील श्री. अ. ज्ञा. मोहेकर व श्री. सु.शा. डोके यांच्याऐवजी अंतिम ज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ठ करण्यात यावी ही विनंती.

धन्यवाद,

आपला विश्वासू,
प्र. म. जोशी 12/10/2011
(प्र. म. जोशी)
प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर -
१. मा. अध्यक्ष, म.प्र.नि. मंडळ, मुंबई.
२. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, मुंबई.
प्रत - मास्टर फाईल.
(C/RO General/.../Letters to HQ General)

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

गोपनीय

उप-प्रादेशीक कार्यालय,
देव टॉवर्स,आरएल२०४५ ,
बार्शी रोड,
तहसिल कार्यालय समोर,
लातूर ४१३५१२

मप्रनि/उप्राकाला/१२८५

दि. ०३/११/२००७

प्रति,
मा.सदस्य सचिव
म.प्र.नि.मंडळ
कल्पतरु पॉईंट
२व३मजला
सायन माटुंगा स्किम रोड क्र.८
सायन्स सर्कल समोर,
सायन (पुर्व)
मुंबई - ४०० ०२२

विषय :- तात्पुरती ज्येष्ठता सुची प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकांची बद्दल आक्षेप /निवेदन

संदर्भ :- १. स्वाक्षरदाराचे गोपनीय पत्र क्र.११८५ दि. ०५/१०/२००७
२. मंडळाचे परिपत्रक पत्र क्र. मप्रनि/आस्था/का-४/ब११०७ दि. ११/१०/२००७चे
३. मंडळाचे पत्र क्र मप्रनि/आस्था/ब-१३१५ दि. ०३/११/२००३चे

मा. महोदय,

मंडळाने परिपत्रक , पत्र नं. जा.क्र. मप्रनि/आस्था/का-४/ब-११०७ अन्वये दि.११/१०/२००७ द्वारे प्रादेशीक अधिकारी संवर्गातील पदधारकांची तात्पुरती ज्येष्ठता सुची प्रसारित केलेली आहे. त्याबाबत मी अत्यंत विनम्रतेने माझे आक्षेप/निवेदन खालील प्रमाणे नोंदवू इच्छितो.

..२...

१. मा.डॉ.मुन्शीलाल गौतम साहेब, यांनी दि. ०३/११/२००७ पत्राद्वारे उप प्रादेशिक अधिकारी या पदाची संपूर्ण प्रक्रिया आवलंबून अंतिम जेष्ठता यादी प्रसारित केली आहे. त्याची प्रत जोडत आहे. त्यानंतर मंडळने कोणतीही जेष्ठता यादी उप प्रादेशिक अधिकारी या पदासाठी प्रसारित केलीली नाही. त्या ज्येष्ठता यादीनुसार श्री नि.गु.निहूल व मी अ.क्र. ५ व ६ वर आहोत. व श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके हे अनुक्रमांक १२ व १३ आहेत.

२. तसेच सविनय सादर करु इच्छितो की मात्र दि. ०३/११/२००३ च्या अंतिम उप प्रादेशिक अधिकारी या पदासाठीअंतिम ज्येष्ठता यादी विचारात न घेता दि. ०३/०८/२००४ रोजी मंडळाने श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके यांना प्रादेशिक अधिकरी या पदाची पदोन्नती दिली आहे. जे त्यावेळी ०३/११/२००३ अंतिम जेष्ठता यादीनुसार श्री नि.गु. निहूल व मला श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके हे कनिष्ठ आहेत. त्यावेळेला श्री नि.गु. निहूल व मी व त्यावेळी जे श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके यांना जेष्ठत्तम उप- प्रादेशिक आहोत व होतो त्यांनी म्हणजेच आम्ही लेखी आक्षेप घेतले होते. मात्र तद्नंतर दडपशाहीच्या मार्गाने सदरहु आक्षेप आम्हाला आमच्या ज्येष्ठतेस व पदोन्नतीच्या हक्कास बाधा न येता मागे घ्यावयास भाग पाडण्यात आले.

३. तद्नंतर पुन्हा आता मंडळाने परिपत्रकाद्धारे प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकांची तात्पुरती ज्येष्ठता सुची परिपत्रक क्रमांक मप्रनि/आस्था/का-४/ब-११०७ दि. ११/१०/२००७ अन्वये प्रसिध्द केलेली आहे, व त्यामध्ये श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके यांचे नांव अ.क्र. ११ व १२ यावर नमुद केले आहे. जेंव्हा मंडळाने पत्र क्र. मप्रनि/आस्था/ब-१३१५ दि. ०३/११/२००३ नुसार उप-प्रादेशिक अधिकारी संवर्गाची अंतिम ज्येष्ठता सूची प्रसारित केलेली आहे. व तद्नंतर मंडळाने कुठलीही उप-प्रादेशिक अधिकारी संवर्गाची यांदी प्रसारित केलेली नाही व त्यानुसार श्री नि.गु. निहूल व मी अ.क्र. ५ व ६ वर आहोत. व श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके हे अ.क्र. १२ व १३ आहेत. त्यामुळे मी मंडळाकडे विनंम्रपणे सादर करु इच्छितो की, मंडळाने परिपत्रक , पत्र क्र. मप्रनि/आस्था/का-४ ब ११०७ दि. ११/१०/२००७ नुसार प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकांची जी तात्पुरती ज्येष्ठता सुची प्रसारित केलेली आहे.मात्र वास्तवीक पाहता श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके हे अधिकारी आम्हांला म्हणजे श्री नि.गु. निहूल व मला, मंडळाने उप प्रादेशिक अधिकारी या पदाची

अंतिम जेष्ठता यादी दि. ०३/११/२००७ प्रसारित केल्यानुसार कनिष्ठतम आहेत. व यामुळे आता मंडळाने परिपत्रक , पत्र क्र. मप्रनि/आस्था/का-४ ब ११०७ दि. ११/१०/२००७ नुसार प्रादेशिक अधिकारी संवर्गातील पदधारकांची जी तात्पुरती जेष्ठता सुची प्रसारित केलेली आहे व त्यामध्ये श्री अ.ज्ञा. मोहेकर व श्री सु.श.डोके यांचे नांव अ.क्र. ११ व १२ वर नमुद केले आहे. तेथे श्री नि.गु. निहूल व माझे नांव असे अ.क्र. ११ व १२ वर असायला पाहिजे.

हे आपल्या माहितीस्तव, योग्य त्या कार्यवाहीस्तव व न्याय निवाडास्तव सविनय सादर.

सोबत :-

माझे गोपनिय पत्र क्र. ११८५ दि. ०५/१०/२००७ ची छायांकित प्रत

धन्यवाद

आपला विश्वासू

प्र.म.जोशी

उप-प्रादेशिक अधिकारी

म.प्र.नि. मंडळ लातूर